आत्म विश्वासाने आपण कोणतेही काम करू शकतो.

दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ







dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार ४ जून २०२५ | अंक १७१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# आता पहिलीपासूनच विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षण

## शिक्षण विभागाचा मोठा निर्णय

राज्यात आता इयत्ता पहिलीपासूनच लष्कराचे बेसिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. राष्ट्रभक्तीची भावना लहान वयातच दृढ होण्यासाठी हे पाऊल टाकण्यात येत आहे. राज्यातील विद्यार्थ्यांना पहिलीपासूनच सैनिकी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. राष्ट्र प्रथम ही भावना रुजवण्यासाठी हे पाऊल टाकण्यात येत असल्याची माहिती समोर येत आहे. शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी नाशिकमध्ये एका जाहीर कार्यक्रमात याविषयीची घोषणा केली आहे. माजी सैनिक, क्रीडा शिक्षक, राष्ट्रीय कॅडेट कोर (एनसीसी) स्काऊट गाईड्स हे विद्यार्थ्यांना हे लष्करी प्रशिक्षण देतील. त्यासाठी राज्यातील 2.5 लाख माजी सैनिकांची मदत घेणार असल्याचे भुसे म्हणाले. " इयत्ता पहिलीपासून मूलभूत सैनिक प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशावर प्रेम करणे, नियमित स्वरुपात शारीरिक व्यायाम करणे आणि शिस्त लगावी यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचा विद्यार्थ्यांना फायदा होईल." अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिली. तर याविषयीच्या प्रस्तावावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिक्रिया दिल्याचे ते म्हणाले. विद्यार्थ्यांसाठी हेल्थकार्ड विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीलाही प्राधान्य दिले जाणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांचे हेल्थ कार्ड तयार करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे, अशी माहिती भुसे यांनी दिली.

### सिंगापूर दौऱ्यातून संकल्पना

जिल्हा परिषदेच्या 48 शिक्षकांना नुकतेचे सिंगापूर या देशाच्या अभ्यास दौऱ्यावर पाठवण्यात आले होते. सिंगापूरमधील शिक्षण व्यवस्थेत राष्ट्र प्रथम ही संकल्पना आढळून आली. त्यामुळे हाच दुवा पकडत राज्यातही राष्ट्र प्रथम ही संकल्पना इयत्ता पहिलीपासूनच राबवण्यात येणार आहे. त्यासाठी इयत्ता पहिलीपासूनच सैनिकी प्रशिक्षण देण्यात येणार असल्याची माहिती शिक्षणमंत्री भुसे यांनी दिली.

# बालविवाह प्रकरणी धारूरमध्ये नऊ जणा विरुध्द गुन्हे दाखल


किल्लेधारूर । वार्ताहर धारूर पोलीस स्टेशन हद्दीत तरनळी येथील एकजनाने चौदा वर्षाचे अल्पवयीन मुलीशी विवाह करून तिचे मर्जी विरूध्द तिचेशी लैंगीक सबंध बळजबरीने ठेवल्या प्रकरणी सबंधीत मुलीचे तक्रारी वरून नऊ जना विरूध्द धारूर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून धारूर न्यायालया समोर हजर केले असता आरोपीची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे. बालविवाह होत असेल तर पोलीसाशी सप़र्क साधावा असे अवाहण ही करण्यात आले आहे धारूर पोलीस ठाणे गुरनं १९१/ २०२५ भा. न्या. संहीता २०२३ कलम ६५ (१), बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ कलम ९,१०,११ सह बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियम २०१२ कलम ४,६,८ प्रमाणे दि.३१/०५/२०२५ रोजी २२.३९ वा. दाखल करण्यात आला असुन यातील पिडीत मुलगी वय १४ वर्ष ०७ महिने २१ दिवस रा. पार्डी ता. किनवट जि. नांदेड यांनी तक्रार दिली की मागील एक महिन्यापुर्वी ते भोगलवाडी येथे तिचे आई व दोन लहान भाउ व पिडीत हिची मावस बहीण वय १५ वर्ष असे यांचे सोबत त्यांची उसतोडणी दरम्यान कर्नाटक येथे भेट झालेले आरोपी यांना भेटण्यासाठी आले होते. त्यादरम्यान पिडीत हिची आई व आरोपी यांनी पिडीत हिचे लग्न ठरवले व त्याच दिवशी आरोपी सुहास श्रीहरी मुंडे वय २६ वर्ष याचे सोबत साध्या पध्दतीने लग्न लावुन दिले. त्यावेळी पिडीत आरोपी याचे सोबत आरोपीचे घरी तरनळी येथे नांदण्यास गेली तिचेसोबत मावस बहीण ही गेली होती. त्या दरम्यान आरोपी याने पिडीत मुलगी हिचेसोबत अनेकवेळा शाररीक संबंध केले. तसेच तिची इच्छा नसतांना देखील शाररीक संबंध केले. व आरोपी याने तिचे शाररीक शोषण केले त्याचा तिला मानसीक त्रास झाला. अशा मजुकरची तक्रार दिल्याने वरीलप्रमाणे

# धक्कादायक ! ८४३ महिलांचे गर्भाशय काढले, ऐन तारुण्यात मरणयातना



बीड : गेल्या अनेक वर्षांपासून ऊसतोड महिलांचे गर्भाशय काढण्याचे प्रकार समोर येत आहेत. दरम्यान सरकारने या महिलांना मानदन देण्याची मागणी ऊसतोड कामगार संघटनेने केली आहे. बीड जिल्हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. दरवर्षी या जिल्ह्यातून दीड लाखाहून अधिक ऊसतोड मजुरांचं राज्याच्या इतर भागात स्थालांतर होतं. ऊस तोडणी हंगाम सुरू झाल्यानंतर मजूर दिवाळी दरम्यान महाराष्ट्र ासह परराज्यात ऊस तोडणीसाठी जातात. सहा महिने ऊस तोडणी करून मार्च महिन्यापर्यंत त्यांचा परतीचा प्रवास असतो. आरोग्य विभागाकडून ऊस तोडणीला जाण्यापूर्वी आणि परत आल्यावर त्यांची आरोग्य तपासणी केली जाते. मात्र याच स्थलांतरा दरम्यान ८४३ ऊसतोड महिला कामगाराचे गर्भाशय काढल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. धक्कादायक म्हणजे यात ३० ते ३५ वयोगटातील महिलाचा अधिक समावेश आहे. गर्भाशय काढल्यानंतर काढल्यानंतर अनेक या महिलांना आरोग्य समस्यांना तोंड द्यावं लागत आहे. मासिक पाळीत रक्तस्राव होणे, जंतुसंसर्ग, पोटात दुखणे अशा गंभीर समस्यांना तोंड द्यावं लागत होतं. त्यामुळे गर्भाशय काढण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला होता. मात्र गर्भाशय काढल्यानंतर मात्र असंख्य आरोग्य समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. तर ज्या महिला कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविण्यासाठी ऊस तोडणी करतात, त्या महिलांना दहा ते पंधरा वर्षांपूर्वी गर्भाशय काढले आहेत, त्यांना आता मरण यातना सहन कराव्या लागत असल्याचं स्वत: महिलांनी सांगितलं.

# बडतर्फ पीएसआय कासलेवर आणखी एक गुन्हा दाखल



आरोप करून व्हिडिओ व्हायरल करणारा बडतर्फ पीएसआय रंजीत कासले याला कार दिल्लीमध्ये पोलिसांनी विविध गुन्ह्यात अटक केली आहे बीडमध्ये जवळपास त्याच्याविरुद्ध चार गुन्हे दाखल झाले असताना आज भाजप आयटीसीलचे संभाजी सुर्वे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बीडमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला सायबर विभागात कार्यरत असलेले पीएसआय रंजीत कासले यांच्याविरुद्ध वरिष्ठाविरुद्ध तक्रार आणि त्यांच्याविरुद्ध व्हिडिओ व्हायरल करून बदनामी प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याला सेवेतून बडतर्फ करण्यात आले याशिवायपूर्वी या प्रकरणात त्याला बीडमध्ये अटक केली कारागृहातून बाहेर आल्यानंतर पुन्हा त्याने राज्याचे मुख्यमंत्री अनेक प्रतिष्ठित नागरिकांवर गंभीर आरोप करत बदनामी केली याबरोबरच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या विरोधात बोलताना त्यांनी कारागृहामध्ये आयटी विभागाचा पदाधिकारी माहिती पुरवण्यासाठी ठेवला असल्याचे म्हणत बदनामी केली या प्रकरणी आयटी विभागाचे भाजपचे पदाधिकारी संभाजी सुर्वे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आज पुन्हा बडतर्फ पीएसआय रंजीत कासले वर गुन्हा दाखल करण्यात आला आह

# गोपीनाथ गडावर पंकजा मुंडे भावूक

बीड। प्रतिनिधी दिवंगत भाजपा नेते गोपीनाथ मुंडे यांचा आज स्मृति दिन आहे. दरवर्षी यादिवशी परळीच्या पांगरी येथील गोपीनाथ गडावर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यंदा मंत्री पंकजा मुडेंसह संपूर्ण कुटुंब उपस्थित होते. गोपीनाथ मुंडेंच्या स्मृति दिनी पहिल्यांदाच पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे एकत्र मंचावर आले. या कार्यक्रमासाठी धनंजय मुंडेही उपस्थित होते. यासोबतच प्रीतम मुंडे आणि पंकजा यांचा मुलगा देखील मंचावर उपस्थित होता. पंकजा मुंडे आपल्या भाषणात काय बोलणार याकडे सर्वांच्या नजरा होत्या. गोपीनाथ मुंडेंच्या आठवणीला पंकजांनी उजाळा दिला आहे. पंकजा मुंडे म्हणाल्या की, या कार्यक्रमांच्या माध्यमातील त्यांना जिवंत ठेवण्याचा आणि त्यांच्या विचारांना जिवंत ठेवण्याचा आम्ही प्रयत्न करतो. अपघाताने माणसे दुरावतात, अपघाताने माणसे एकत्र येतात. आज जर मुंडे साहेब असते तर देशातील फार मोठ्या पदावर नक्कीच असते, त्यांच्या सहकार्यासोबत ते आपल्याला रोज दिसले असते. तुम्ही त्यांना कुठे शोधता हे माहिती नाही, पण मी तुमच्यामध्ये त्यांना शोधते. आज ११ वर्ष पूर्ण झाली आहेत, गावागावात मुंडे साहेबांची जयंती साजरी होते. हे आमचे भाग्य आहे, आमच्या परिवाराचे भाग्य आहे. मी आज जिजांचा (दिवंगत आमदार आर.टी देशमुख) फोटो गोपीनाथ गडावर लावला आणि मी सुतक देखील पाळले. मला ब्राह्मणांने सांगितले की, जिजासाठी ताई तुम्ही एखादा पदार्थ सोडा बरं का...मी लेक म्हणून इथे तीन दिवस थांबून राहिले

# शेतात सडलेल्या टमाट्यांचा लाल चिखल, शेतकऱ्याचे अश्रू अनावर

आष्टी : राज्यात मागील आठवड्यापर्यंत अवकाळी पाऊस झाला. या पावसामुळे होत्याचे नव्हते झाले. शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाल्याने शेतकऱ्याला आर्थिक फटका बसला आहे. अशातच आष्टी तालुक्यातील टोमॅटो उत्पादक शेतकऱ्याचे अवकाळीने सर्व काही हिरावून घेतले असून परिपक्व होऊन पिकलेल्या लाल टोमॅटोंचा लाल चिखल आता शेतात पाहण्यास मिळत आहे. शून्य



उत्पादन आल्याने आणि शेतात पडलेला टोमॅटोंचा सडा पाहून

शेतकऱ्याचे अश्रू अनावर झाले होते. राज्यात अवकाळी पावसाने झोडपून काढले आहे. आष्टी तालुक्यात देखील मोठ्या प्रमाणात अवकाळीचा फटका बसल्याने मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान आष्टी तालुक्यातील राम गोरख शेळके यांनी सात हजार टोमॅटोची लागवड केली होती. हि टोमॅटोची शेती अवकाळीमुळे पूर्णपणे खराब झाली आहे

# संतोष देशमुख हत्याप्रकरणी १७ जूनला पुढील सुनावणी, वाल्मिक कराडच्या अर्जावर युक्तिवाद होणार

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. हे प्रकरण संपूर्ण देशभरात गाजले होते. या प्रकरणात केज पोलीस ठाण्यात आठ जणांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल आहे. या प्रकरणी आज सुनावणी पार पडली, यात या हत्याकांडाचा मास्टरमाइंड वाल्मिक कराडने मला मकोकातून दोषमुक्त करा असा युक्तिवाद वकिलांच्या मार्फत केला. आता यावर १७ जूनला पुढील सुनावणी वेळी युक्तिवाद होणार आहे. संतोष देशमुख हत्याकांडाची पुढील सुनावणी १७ जूनला होणार आज झालेल्या सुनावणीनंतर विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी सांगितले की, संतोष देशमुख हत्याप्रकरणाची पुढील सुनावणी १७ जूनला होणार आहे. वाल्मिक कराडने आज वकिलामार्फत अर्ज करत मला मकोका अंतर्गत दोषमुक्त करा अशी मागणी केली. यावर आता १७ जूनला युक्तिवाद होणार आहे. तसेच न्यायालयात प्रलंबित असणाऱ्या अर्जांवर त्या युक्तिवाद होणार आहे. हे प्रकरण नेमकं काय आहे? बीडमधील मस्साजोगचे सरपंच



संतोष देशमुख यांचे अपहरण करुन त्यांची हत्या करण्यात आली होती. देशमुख यांच्या भावाच्या फिर्यादीनंतर केज पोलीस ठाण्यात सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या हत्याकांडानंतर संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली होती. तसेच या हत्येमागे धनंजय मुंडेंचे निकटवर्तीय वाल्मिक कराड यांचा हात असल्याचा आरोप अनेक राजकीय नेत्यांनी केला होता. कालांतराने या प्रकरणात वाल्मिक कराडचा हात असल्याचे समोर आले, त्यानंतर कराड पोलिसांना शरण आला व त्याच्यावरही मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली. सध्या या प्रकरणातील सर्व आरोपी तुरुंगात आहेत, आता १७ जूनला होणाऱ्या सुनावणीत कोर्ट काय निर्णय देणार हे पाहणे महत्वाचे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ४ जून २०२५
https://lokaarambh.com




# संपादकीय

## काही विमाने पाडल्याची कबुली

युक्रेनने या हल्ल्यात रशियाच्या अत्यंत महत्त्वाच्या, संख्येने मोजक्या अशा अण्वस्त्र वाहक विमानांसही लक्ष्य केले. आश्चर्य युक्रेनच्या या हल्ल्याचे जसे आहे तसेच, किंबहुना त्याहूनही अधिक, ते आहे रशियाच्या कबुलीचे. युक्रेनच्या या हल्ल्यानंतर अवघ्या काही तासांत रशियाच्या वतीने जे काही झाले त्याची वस्तुस्थिती सादर केली गेली आणि ङ्गयुक्रेनच्या ड्रोन्सनी रशियात खोलवर मुसंडी मारून आमच्या अनेक विमानांचे आणि विमानतळांचेही नुकसान केलेफ, अशी कबुलीही दिली गेली. या प्रामाणिकपणासाठी रशियाचे नेतृत्व कौतुकास पात्र ठरते. रशियाने हे सत्य मान्य केले आणि पाठोपाठ युक्रेनला जन्माची अद्दल घडवण्याचा इशाराही दिला. तो इशारा रशिया प्रत्यक्षात आणेलही. पण यात लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे ङ्गपर्ल हार्बरफ घडले तेव्हा ते घडवून आणणाऱ्या जपानपेक्षा कित्येक पट सामर्थ्यवान अमेरिकेने त्या वेळी त्याची कबुली दिली होती आणि पुढे जपानला धडा शिकवला. जे काही झाले ते कबूल करण्यात ना अमेरिकेस त्या वेळी कमीपणा वाटला ना आता रशियास तसा तो वाटतो. तेव्हा प्रश्न असा की आपले संरक्षणदल प्रमुख अनिल चौहान यांनी ताज्या संघर्षात पाकिस्तानने आपली काही विमाने पाडल्याची कबुली दिली; त्यावर इतका गहजब होण्याचे कारण काय? युद्ध म्हटले की हे आलेच. महत्त्व असते ते शेवटी अंतिम निकालास. तो नि:संशयपणे आपल्या बाजूने लागलेला आहे आणि आपण पाकिस्तानला धडा शिकवलेला आहे. असे असताना या संघर्षात पाकिस्तानने आपले काही नुकसान केले असेल तरी ते मान्य केले तर इतका गदारोळ का? यातही एक हास्यास्पद प्रकार म्हणजे चौहान यांनी जी काही विधाने केली त्यास ङ्गकबुलीफ म्हणावे की नाही, यावर होत असलेली चर्चा. कबुली ही गुन्ह्याची देतात आणि आपण तर काही गुन्हा केलेला नाही, सबब त्यास कबुली कसे म्हणायचे, असा प्रश्न एका वैचारिक बावळट वर्गास पडलेला दिसतो. कबुली म्हणायचे नसेल तर मग चौहान यांनी जी काही विधाने केली त्यास काय म्हणावे? खरे तर या समाजमाध्यमी वैचारिक वेठबिगारांनी ङ्गकबुलीफ या शब्दावर घेतलेल्या भाषिक शंकेपेक्षाही एक महत्त्वाचा मुद्दा संरक्षणदल प्रमुखांनी सिंगापूर येथील मुलाखतीत मान्य केला. पाकिस्तानच्या कृतीनंतर तब्बल दोन दिवस आपणास आपले विमान दल जमिनीवर (ङ्गग्राउंडेडफ) राखावे लागले, हा तो मुद्दा. त्याचा अर्थ असा की पाकिस्तानने आपल्या विमान दलाचे मोठे नुकसान केल्यानंतर काही काळ आपणास आपली हवाई हल्ला मोहीम स्थगित करावी लागली. त्यानंतर आपण सगळ्या मोहिमेची फेरआखणी केली आणि आपल्या विमान दलाने चमकदार कामगिरी करत पाकिस्तानात खोलवर मारगिरी करून त्यांचे अतोनात नुकसान केले. ङ्गङ्गपाकिस्तानने आपले नुकसान किती केले यापेक्षा त्या नुकसानीनंतर आपण काय केले; ही बाब अधिक महत्त्वाची ठरतेफ्फ, असे चौहान म्हणतात त्यात काहीही गैर नाही. तरीही त्यांच्या या कबुलीनिदर्शक विधानावर आपल्याकडे बरीच नाराजी निर्माण झाल्याचे दिसते. ते पाहून काही प्रश्न उपस्थित होतात. जसे की मुळात या संघर्षात जे काही झाले त्याचा हिशेब जाहीरपणे मांडण्याचा अधिकार संरक्षणदल प्रमुख चौहान यांस दिला कोणी? केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी या संदर्भात जनरल चौहान यांस मुखत्यारपत्र दिले होते काय? तशी शक्यता कमीच. कारण संरक्षणमंत्र्यांचा एकूण आवाका आणि तूर्त त्यांस दिले गेलेले अधिकार पाहता राजनाथ सिंह यांच्या वतीने असे काही केले गेले असण्याची शक्यता नाही. म्हणजे मग राहता राहिले पंतप्रधान कार्यालय वा खुद्द पंतप्रधान. देशाच्या सर्वोच्च नेत्याची परवानगी असल्याखेरीज जनरल चौहान स्वत:च्या हिमतीवर इतके विधान करू शकतील काय? तसे त्यांनी केले असेल काय? इतकी स्वतंत्र प्रज्ञा त्यांच्या ठायी आहे काय? आणि तशी ती असूनही त्यांना या पदावर नेमण्याचा मोठेपणा केंद्राने दाखवला काय? यापेक्षाही अधिक महत्त्वाचा मुद्दा असा की ही कबुली द्यायचीच होती तर त्यांनी ङ्गरॉयटर्सफ सारख्या ङ्गपाश्चात्त्य धार्जिण्याफ आणि म्हणून ङ्गभारत–विरोधीफ वृत्तसेवेची निवड का बरे केली? अनेक भारतीय वृत्तवाहिन्यांनी एक चकार शब्द न काढता, कोणताही उलट प्रश्न न विचारता जनरल चौहान यांचे विधान दिवस–दिवस ङ्गचालवलेफ असते आणि ङ्गङ्गपाहा भारतीय लोकशाही किती प्रामाणिक, पारदर्शी आहेफ्फ, त्याची दवंडीही पिटली असती. म्हणजे अलीकडे विविध विक्री योजनांत ङ्गवन प्लस वनफ, एकावर एक मोफत काय काय दिले जाते, तद्वत या विधानाच्या प्रसारणाबरोबर लोकशाही प्रचारही त्यांनी मोफत केला असता आणि पाकिस्तानला त्याची जागा दाखवून दिली असती. परंतु जनरल चौहान यांनी रॉयटर्सची निवड केल्याने हे काहीच झाले नाही. भारतीय वाहिन्यांची ही संधी हुकली आणि बातम्यांतील निवडक तुकडे समाजमाध्यमी फिरते ठेवण्याचा राष्ट्रप्रेमी उद्योग वैचारिक वेठबिगारांसही करता आला नाही. आणि परत त्यांनी हे विधान केले ते सिंगापुरात? तेही ङ्गशांग्रिला डायलॉगफ या चर्चेच्या निमित्ताने? ते का? तसे पाहू गेल्यास जनरल चौहान हे मूळचे पायदळाचे अधिकारी. त्यांची हयात गेली पायदळात. केंद्राने त्यांना निवृत्योत्तर या पदासाठी पाचारण केले. याआधीचे संरक्षणदल प्रमुख जनरल बिपीन रावत यांच्या अपघाती निधनानंतर हे पद रिक्त झाले आणि तेथे जनरल चौहान यांस नेमले गेले. या पदावरील व्यक्ती संरक्षणदल प्रमुख असली तरी लष्करी विमानांच्या पडझडीविषयी भाष्य करण्याची संधी त्यांनी हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांस द्यावयास हवी होती.

# सामान्य जनांचा असामान्य जननायक गोपीनाथराव मुंडे साहेब

लोकनेते जननायक गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या नावापूर्वी कै.स्व.किंवा वै.असं काहीही लिहायला मन धजावत नाही कारण साहेबांचे एकाएकी आनंदाने भरलेल्या मांडवातून निघून जाणे अजूनही मनाला पटतच नाही. सकाळचा कोवळा सूर्योदय नवीन ऊर्जा घेऊन येतो. उगवतीच्या नारायणाला पाहूनच कामाला सुरुवात होते. पण ३ जून २०१४ चा सूर्यनारायण काळी किनार घेऊनच आला.सकाळ समय होता तो. काही लोकं नुकतीच उठली होती. कितीतरी जनता अजून झोपेतच होती.उठलेल्या लोकांनी रोजच्या सवयीप्रमाणे टी.व्ही .चालू केला होता.धक्कादायक बातमी सतत झळकत होती .ती बातमी होती लोकनेते मुंडे साहेबांच्या अपघाताची. अपघातानंतर मुंडे साहेब सुखरूप असल्याची बातमी कळावी म्हणून टी.व्ही समोरच जनता चिटकून बसली होती. पण अवघ्या काही क्षणातच बातमी आली ती मुंडे साहेब गेल्याची. संपूर्ण देश या बातमीने हादरून गेला.महाराष्ट्राचं राजकीय दैवत कायमस्वरुपी हरवलं. बीड जिल्ह्याच्या बाबतीत बोलायचे झाले तर इथला देव्हाराच रिकामा झाला. साहेबांची जीवनकहानी अत्यंत संघर्षमय आहे.सामान्य जनांचे ते असामान्य नेते होते.उच्च वर्णीय भाजपाचा ते बहूजन चेहरा होते .एवढंच नव्हे तर भाजपाचे पीक महाराष्ट्राच्या जमीनीत रुजविले, उगविले, फळाला आणले ते मुंढे साहेबांनीच.पंढरीचा विठोबा, भगवानगड हे साहेबांचे अध्यात्मिक प्रभावित केंद्र. भगवानगडाचा आजचा विकास ही साहेबांची देण आहे तर साहेबांच्या सर्व राजकीय घडामोडींचा भगवानगड साक्षीदार आहे. शेतकरी, ऊसतोड कामगार, कारखान्यातील कामगार यांना साहेब अत्यंत जवळचे वाटत. स्पष्ट व कणखर आवाज ,रुबाबदार शरीरसंपदा,हसतमुख चेहरा, मार्मिक शाब्दिक कोटी पेरण्याची कला, सुसंस्कृत टीका करण्याचे कसब, तडाखेबंद भाषण, राजकारणविरहित मैत्री ही साहेबांची काही वैशिष्ट्ये. निवडणुक आयुक्त या पदाचे अस्तित्व जसे टी.एन् .शेषन यांनी दाखवून दिले त्याप्रमाणे विरोधी पक्ष नेता हे पद मुंडे साहेबांनी दाखवून दिले.दमदार विरोधी पक्षनेता व त्याकाळी काढलेली संघर्ष यात्रा शिवसेना भाजपाला सत्ता देऊन गेली. मुंडे साहेब कधीच पंचतारांकीत संस्कृतीत रमले नाहीत. दौऱ्यावर असताना ते नेहमी कार्यकर्त्याकडेच मुक्कामी थांबत असत.जादूची कांडी, माधव (माळी, धनगर, वंजारी) या शब्दांचा उगम साहेबांशी संबंधित आहे.बंद पडलेले अनेक कारखाने त्यांनी ऊर्जितावस्थेत आणले. नव्या तरुण रक्तास त्यांनी जसे सत्तेत आणले तसे राजकारणातून अस्त होऊ पाहत असलेल्या



काही घराण्यांना त्यांनी पुन्हा वैभव प्राप्त करुन दिले. ज्यांची घराणी कधीच काँग्रेस सोडणार नाहीत अशा मोहिते, निंबाळकर, भोसले या घराण्यांना त्यांनी भाजपात आणण्याची किमया करुन दाखवली.राजू शेट्टी, रामदास आठवले ,महादेव जानकर ,विनायक मेटे अशा वलयांकित लोकांना त्यांनी भाजपाच्या कळपात सामील केले. सत्ता असो वा नसो कायम सत्ता असो वा नसो कायम सत्ता असो वा नसो कायम सत्ता असो वा नसो कायम गर्दीतला चेहरा हीच साहेबांची खास गर्दीतला चेहरा हीच साहेबांची खास गर्दीतला चेहरा हीच साहेबांची खास गर्दीतला चेहरा हीच साहेबांची खास गर्दीतला चेहरा हीच साहेबांची खास ओळख ओळख ओळख ओळख ओळख संघर्षमय जीवन जगताना साहेबांनी दोन वेळा मातृ पक्षावर जाहीर नाराजी व्यक्त केली होती. कदाचित तिस–यांदा नाराजी होण्याचा प्रसंग आलाच असता तर साहेबांनी वेगळी चूल मांडून प्रस्थापितांना दणका दिला असता. साहेबांच्या जीवनाचे अनेक पैलू आहेत.साहेब आपल्यातून गेलेत हे खरे वाटत नाही.त्यांच्या मरणाची आजही चूटपूट आहे.लढवय्या नेत्याच्या अपघाताला घातपाताचा वास येतोय असं सामान्य जनता आजही खाजगीत कुजबुजतेय. लोकशाही व्यवस्थेत दीर्घकाळ राज्य करायचे असेल तर कोणत्याही टप्प्यावर जनतेशी नाळ तुटता कामा नये.हे ब्रीद साहेबांनी अखेरच्या श्वासापर्यंत जपले म्हणूनच राजकारण हा पिंड नसलेल्या व असलेल्या सर्व लोकांना साहेब आपले वाटले. मृत्यू हा कोणालाच चुकत नाही हे मान्य पण मृत्यू अनेक वेळा चुकतो हे मान्य करुनही काही उपयोग नाही. ऋतुमानाप्रमाणे पानांची गळती हा निसर्ग नियम आहे पण रसरस वृक्षच डोळ्यादेखत जाळणं हा कसला नियती धर्म आहे.देवा तुला शोधू कुठं? ही आर्त हाक साहेबांच्या अकाली जाण्यानं आजही कंठातून बाहेर येते ती नियती चुकल्यामुळेच. देशातल्या एका छोट्या खेड्यात जन्म व वलयांकित वलयात देशाच्या राजधानीत मृत्यू हा साहेबांचा प्रवास अचंबित ,थक्क करायला लावणारा असला तरी साहेबांनी तो सत्यात उतरवून दाखविलेला आहे. मुंडे साहेबांचे शारीरिक अस्तित्व आता भोवताली नसले तरी ते भोवताली असल्याचे जाणवतेच.त्यांचे सामाजिक, राजकीय कार्य ,तळागाळातल्या लोकांसाठी दीपस्तंभ राहील. बीडपुरतं बोलायचं झाल्यास, कोणत्याही राजकीय घडामोडीवेळी साहेबांची आठवण येतेच.त्यांचे पोस्टरही खूप प्रसन्न असतात ;वाटतं एखाद्या पोस्टरमधून खरंच ते खाली येतील. साहेबांना विनम्र अभिवादन...!!!

# वायझेड वरुन दोघांत जुंपली, मिटकरी-हाकेंची

## एकमेकांवर टोकाची टीका, लायकी, कुत्र्यांचाही उल्लेख!

ओबीसी समाजाचे नेते लक्ष्मण हाके यांनी उपमख्यमंत्री अजित पवार यांच्यावर सडेतोड टीका केली आहे. अजित पवार हे नेहमीच भाजपाचे नेते अमित शाह यांच्या इशाऱ्यावर चालतात. आम्हाला निधी देताना अजित पवार यांच्या हाताला लकवा मारतो का? अशा शेलक्या शब्दांत होके यांनी अजितदादांना लक्ष्य केलं होतं. या टीकेनंतर आता राष्ट्रवादीचे आमदार अतुल मिटकरी आणि हाके यांच्यात चांगलीच जुंपली आहे. मिटकरी यांनी हाकेंना वायझेड म्हटलंय, हाकेंची त्यांनी औकातही काढलीय. तर दुसरीकडे जोपर्यं मिटकरी माझ्यावर टीका करत राहणार तोपर्यंत मी अजि पवार यांनी आणखी प्रश्न विचारत राहणार? असा पवित्रा घेतलाय. अमोल मिटकरी नेमकं काय म्हणाले होते? लक्ष्मण हाके हा भुंकणारा कुत्रा आहे. त्यांना जास्त किंमत दिली नाही पाहिजे. ते महादेव जाणकर यांचे उपकार विसरले आहेत. त्यांच्यासोबत राहून हाके यांनी जानकर यांना दगा दिला. ते काय ओबीसी समाजाबद्दल बोलत आहे. सरकारने ओबीसी समाजासाठी किती काम केलं आहे, याची त्यांना कल्पना नाही. त्यांची लायकी नाही, अशी टोकाची टीका मिटकरी यांनी हाके यांच्यावर केली. वाय झेड नावाचा एक सिनेमा... तसेच, लक्ष्मण हाके यांनी



औकातीत रहावं. त्यांच्यात दम असेल तर त्यांनी फक्त माझ्या शर्टच्या बटणाला हात लावून दाखवावा. त्यांना मराठी भाषा समजत नाहीये. वाय झेड नावाचा एक सिनेमा आहे आणि हा सिनेमा जाऊन पहावा, असा खोचक सल्ला मिटकरी यांनी हाके यांना दिला होता. नांदेडमधील भोकर मतदारसंघात हाके यांनी प्रहार संघटनेच्या उमेदवारासोबत काय केलं हे सर्वांना माहिती आहे. यासंदर्भात त्यांनी उत्तर देणं टाळलं आहे. हाके हे राज्य मागास आयोगाचे सदस्य कसे असू शकतात. हाके हे जातीयवादी आहेत, असा गंभीर आरोपही त्यांनी केला. हाके यांना राज्य मागास आयोगावर कोणी घेतलं? हाके यांची पात्रता होती का? आगामी अधिवेशनात मी हा मुद्दा मांडणार आहे. अजित पवार यांच्यावर बोलण्याची त्यांची लायकी नाही. हाके यांनी आपल्या लायकीत राहावे, असा सल्लाही मिटकरी यांनी दिला. मिटकरी यांना हाकेंचं जशास तसं उत्तर तर मिटकरी यांच्या या टीकेला हाके यांनीदेखील जशास तसे उत्तर दिले आहे. जोपर्यंत मिटकरी वायझेड शब्दाचा अर्थ सांगणार नाहीत, तोपर्यंत मी अजित पवार यांचे कपडे फाडायचे सोडणार नाही. मी ओबीसींचे प्रश्न विचारतोय. अजित पवार यांनी यांच्या आमदाराला कमरेखालच्या शिव्या द्यायला ठेवलंय. अमोल मिटकरी जेवढी माझ्यावरती टीका करतील तेवढे मी अजित पवारांना जास्त प्रश्न विचारणार आहे, असा पलटवार हाके यांनी केला. तसेच मी लोकांचे प्रश्न मांडतोय आणि हे इकडं माझ्यावर खालची टिका करतायत. मिटकरी बोलतात वेगळं आणि दाखवतात वेगळं ते विरोधाभास निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. मिटकरी हे अशा पक्षाचे प्रवक्ते आहेत ज्या पक्षाचे मालक नेहमी सत्तेत बसायचा प्रयत्न करतात. महाराष्ट्राच्या राजकारणाचा स्तर खाली चाललाय. अजित पवार यांना हे समजायला हवे. मिटकरी यांना अजित पवारांचा पाठिंबा आहे, असं गंभीर आरोप हाके यांनी मिटकरी यांच्यावर केला. दोन शिव्या दिल्या तर मी.. तसेच, माझे जुने फोटो मॉर्फ करुन दाखवले जात आहेत. आम्ही गावाकडची लोक आहोत. आमची सुरुवात शिव्यांनीच होते. अमोल मिटकरी यांनी दोन शिव्या दिल्या तर मी अजित पवार यांना दहा प्रश्न विचारणार आहे. माझा लढा अजित पवार या वैयक्तिक माणसाबरोबर नाही माझा लढा प्रवृत्तीविरोधात आहे. अमोल मिटकरी यांना अजित पवार यांनी संधी दिली आहे. त्यांनी संविधानिक मार्गाने बोललं पाहिजे, असा सल्लाही हाके यांनी मिटकरी यांना दिला.

# किनवट, इस्लापूर भागाकडे अधिक लक्ष देऊ -अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ

## मंत्री झिरवाळ यांनी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना धरलं धारेवर

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : महाराष्ट्र शासनाचा प्रतिनिधी म्हणून सामान्य माणसाची कामे करणे आमची जबाबदारी असून अतिदुर्गम भागातील बंजारा, आदिवासी बहुल भाग असलेला इस्लापूर किनवटकडे अधिक लक्ष देणार असल्याची ग्वाही राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली. गोकुंदा येथील शासकीय विश्रामगृहात त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला पत्रकार परिषद घेण्यात आली पत्रकार परिषदेत पत्रकारांनी किनवट व परिसरातील सर्व समस्या दाखवून दिल्या तालुक्यात चालत असलेले गुटखा मटका आरोग्य सेवेतील उदासीनता कर्मचाऱ्यांचा अभाव या सर्व समस्या पत्रकारांनी मांडल्या तर अन्न व प्रशासनातील अधिकाऱ्यांना समोर बोलून त्यांनी धारेवर धरत योग्य ते कार्यवाही करण्याचे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यांनी सूचना केल्या आणि आदिवासी बहुल भागामध्ये चांगल्या सेवा पुरवण्याचे हे त्यांनी यावेळी आश्वासित केले. किनवट तालुक्यातील इस्लापूर भागात अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांचा दौरा होता. सर्वप्रथम त्यांनी इस्लापूर वनविभागाच्या कार्यालयाला भेट देऊन याठिकाणी वृक्षारोपण त्यांच्या हस्ते करण्यात आले. नंतर त्यांनी नांदेड जिल्हयातील पर्यटन स्थळ असलेल्या सहस्रकुंड धबधबा येथे महादेवाचे मंदिराचे दर्शन घेऊन धबधबा परिसराची पाहणी केली. यावेळी ट्रस्ट व वाळकी ग्रामपंचायतच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर इस्लापूर परिसरातील वन्य प्राण्याचे प्रसिद्ध ठिकाण असलेल्या हरण खरबा वरील वन्य प्राण्याची त्यांनी पाहणी केली. त्यानंतर हुडी येथे शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी नगराध्यक्ष इशा खान आदिवासी ज्येष्ठ नेते नारायणराव सिडाम,जयवंत वानोळे, प्रा.विजय खूपसे तालुकाध्यक्ष संजय सिडाम दिग्रसचे बाळू पाटील पवार कुपटीचे सरपंच शिवाजी भुरके, बिभीषण सानप यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. पत्रकारांच्या शिष्टमंडळाने घेतली कॅबिनेट मंत्र्यांची भेट :- राज्याचे अन्न



व औषधी प्रशासन कॅबिनेट मंत्री ना.नरहरी झिरवाळ हे किनवट दौऱ्यावर आले असता त्यांची किनवट येथील पत्रकारांच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन विविध विषयावर सविस्तर चर्चा केली. यावेळी लोकमतचे ज्येष्ठ पत्रकार गोकुळ भवरे पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष प्रमोद पोहरकर सचिव बालाजी सिरसाट दिलीप पाटील अन्य पत्रकार उपस्थित होते.....................................
.........................................

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ४ जून २०२५
https://lokaarambh.com


# प्रधानमंत्री आवास योजनेत मनोऱा पंचायत समितीला राज्यस्तरीय पुरस्कार



मानोरा प्रजा-शासन प्रतिनिधी धानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत उत्कृष्ट कामगिरीबद्दल मनोऱा पंचायत समितीला राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार माननीय केंद्रीय मंत्री श्री. शिवराजसिंह चव्हाण, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री मा. अजित दादा पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचा स्वीकार म. गट विकास अधिकारी प्रफुल्ल भोरखडे सर, पंचायत समिती मनोऱा यांनी केला. संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यासाठी ही बाब अत्यंत गौरवाची असून, प्रधानमंत्री आवास योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मनोऱा पंचायत समितीचा हा सन्मान प्रेरणादायी ठरतो. राज्यातील सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत, तसेच प्रधानमंत्री आवास योजनेत प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या जिल्ह्यांची यादीही कार्यक्रमात जाहीर करण्यात आली. यामध्ये मनोऱ्याचा विशेष उल्लेख करण्यात आला. या पुरस्कार वितरण सोहळ्याला विविध जिल्ह्यांतील अधिकारी, जनप्रतिनिधी, व शासकीय यंत्रणांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बीड – येथील ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या प्रमुख पदाचा पदभार स्वीकारला या अनुषंगाने त्यांचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष सदाशिव अण्णा बिडवे, बीड शहराध्यक्ष अमर जान पठाण, शहर सचिव कार्तिक जव्हेरी, शहर उपाध्यक्ष आकाश टाकळकर सह आदी उपस्थित होत

# जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा 2026साठी अर्ज प्रक्रिया सुरू




प्रजा-शासन प्रतिनिधी
महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी. केंद्र शासनाच्या नवोदय विद्यालय समितीमार्फत २०२६ साठी वर्ग ६ वीच्या प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. ही परीक्षा अखिल भारतीय स्तरावर घेतली जाते आणि जिल्ह्यातील ८० विद्यार्थ्यांची निवड होते. अर्ज करण्याची अंतिम तारीख २९ जुलै २०२५ आहे. या निवासी शाळांमध्ये सीबीएसई अभ्यासक्रमासह संगणक, क्रीडा, संगीत, कला आदींचे शिक्षण मोफत दिले जाते. विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, गणवेश, जेवण व निवास सुविधाही विनामूल्य उपलब्ध असतात. अर्ज करताना विद्यार्थी सलग ३ री ते ५ वी शिकलेला असावा. जन्मतारीख ०१ मे २०१४ ते ३१ जुलै २०१६ या दरम्यान असणे आवश्यक आहे. अर्ज करताना आवश्यक दस्तऐवज, फोटो, सही व प्रमाणपत्रे निश्चित फॉरमॅटमध्ये अपलोड करावी लागतात. प्रवेश परीक्षा १३ डिसेंबर २०२५ रोजी (शनिवार) होणार आहे. कोणतीही परीक्षा फी नाही. विद्यार्थ्यांनी व पालकांनी शेवटच्या तारखेच्या आधी अर्ज भरून ही संधी निश्चित साधावी, असे आवाहन करण्यात आले आहे. (अधिक माहिती आणि अर्ज प्रक्रिया संदर्भात जवळच्या शाळेकडे किंवा अधिकृत संकेतस्थळावर संपर्क साधावा.)

# मा बच्चू कडू यांचे बेमुदत अन्नत्याग उपोषण

प्रतिनिधी
दिव्यांग, शेतकरी, शेतमजूर, मूकबधिर, कामगार, वाहन चालक, मेंढपाळ, मच्छीमार, बेघर आणि ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या वेगवेगळ्या मागण्या पूर्ण करण्यासाठी प्रहार चे बच्चू कडू यांचे बेमुदत अन्नत्याग उपोषण दिनांक ८ जून पासून सुरू होत आहे हे उपोषण राष्ट्रसंत तुकडोजी महाराज महासमाधी जवळ गुरुकुंज मोझरी ता.तिवसा जि. अमरावती येथे होणार आहे या उपोषणात त्यांच्या विविध मागण्या आहेत जसे की दिव्यांग व विधवा महिलांना रुपये ६००० मानधन देण्यात यावे आपल्या संकल्पानुसार शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी तसेच शेतमालाला हमीभाव २० टक्के अनुदान देण्यात यावे दिनांक ७ एप्रिल २०२५ रोजी आपले अध्यक्षतेत झालेल्या बैठकीच्या इतिवृत्त प्रमाणे शासन निर्णय काढण्यात यावे युवकांच्या हातात काम द्यावे नाहीतर सन्मान जनक दान देण्यात यावे तसेच रिक्त जागा तातडीने भरण्यात याव्यात व जास्त पदसंख्यांच्या जाहिराती प्रसिद्धी करण्यात याव्या शहराप्रमाणे ग्रामीण भागातील




घरकुलांकरिता समान निकष लावून किमान रुपये ५ लाख अनुदान घरकुल लाभार्थ्यांना देण्यात यावे शेतकऱ्याप्रमाणे शेतमजुरांचा अपघाती मृत्यू झाल्यास आर्थिक सहाय्य देण्यात यावे तसेच शेतमजुराची स्वतंत्र मंडळ स्थापन करण्यात यावे पेरणी ते कापणी पर्यंत मजुरीची सर्व कामे MREGS मध्ये घेण्यात यावे तसेच फळपिकांना ३:५ रेसो लावून दुग्ध व्यवसाय सुद्धा MREGS ला जोडण्यात यावा निवासी अतिक्रमण नियमा कुल करण्यात यावे कांद्याचे दर स्थिर राहावेत यासाठी किमान ४० रुपये बाजार भाव होईपर्यंत निर्यात बंदीचा निर्णय करू नये निर्यात बंदीच्या निर्णयानंतर बाजारभाव कोसळताच त्यावेळेस बाजारभाव सावरण्यासाठी नाफेड व एनसीसीएफ सारख्या संस्थांनी थेट शेतकऱ्यांचा कांदा बाजार समिती मधून खुल्या लिलावात खरेदी केला पाहिजे किमान २५ रुपये बाजारभाव राहावे त्यासाठी धोरण मिळवण्यात यावे अशा वेगवेगळ्या मागण्या आमदार बच्चू कडू यांनी या उपोषणात करणार आहे या आंदोलनात अमरावती, नागपूर, बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, सोलापूर, पुणे, नाशिक, नवी मुंबई व मुंबई सर्व विभागामधून हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते, दिव्यांग बांधव, शेतकरी, शेतमजूर हे उपस्थित राहणार आहे.

# कारंजा येथे ‘आपदा मित्र सखी’ प्रशिक्षण यशस्वीपणे संपन्न

कारंजा | प्रतिनिधी
कारंजा येथे आपत्ती व्यवस्थापन व मदत विभाग मंत्रालय, जिह्ला आपत्ती व्यवस्थापन कक्ष, जिह्लाधिकारी कार्यालय वाशिम, आणि आयटस संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने २१ मे ते १ जून दरम्यान ‘आपदा मित्र सखी’ प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. स्थानिक श्री गुरुदेव सेवाश्रम, शांतीनगर येथे झालेल्या या प्रशिक्षणात कारंजा, मानोरा आणि मंगरूळपीर या तीन तालुक्यांतील महिलांचा मोठा सहभाग होता. प्रशिक्षणाचा उद्घाटन सोहळा २१ मे रोजी जिह्ला आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत आणि सर्वधर्म मित्र मंडळाचे अध्यक्ष श्याम सवाई यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी प्रशिक्षक शिशिर फणसळकर, यश पोवार, अनिकेत जाधव, सौरभ कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. १२ दिवस चाललेल्या या प्रशिक्षणात, आपत्ती काळात आवश्यक असलेल्या विविध कौशल्यांचा समावेश होता. प्रशिक्षणार्थींना आपत्ती व्यवस्थापनासंदर्भातील सखोल माहिती देण्यात आली. शैक्षणिक साधने, प्रात्यक्षिके, प्रत्यक्ष सराव आणि मार्गदर्शन यांच्याद्वारे प्रशिक्षण




अधिक प्रभावीपणे दिले गेले. २९ मे रोजी इंझोरी येथील अडाण नदीवर, पाण्यातील आपत्ती व्यवस्थापनाचे प्रत्यक्ष सराव घेण्यात आले. या सरावात लाईफ बोट, लाईफ जॅकेट आणि इतर सुरक्षा साहित्याचा वापर करण्यात आला. दिपक दहिफळे, अध्यक्ष जिह्ला आपत्ती व्यवस्थापन समिती आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या सरावाचे नेतृत्व केले. प्रशिक्षक शिशिर फणसळकर हे सेवानिवृत्त नेव्ही ऑफिसर असून, त्यांनी आपले अनुभव, ज्ञान आणि कौशल्य प्रशिक्षणार्थींना दिले. कार्यक्रमाने महिलांमध्ये आपत्ती काळात स्वावलंबी आणि सजग राहण्याचे बळ निर्माण केले. हा उपक्रम महिला सक्षमीकरणासोबतच समाज सुरक्षेसाठी महत्त्वाचा ठरला आहे.

# स्व. आर. टी. जिजा देशमुख यांच्या कुटुंबीयांचे धनंजय मुंडे यांनी केले सांत्वन

परळी वैद्यनाथ : माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी आज माजी आमदार तथा भाजपचे नेते स्वर्गीय आर. टी. जिजा देशमुख यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या स्मृतिस आदरांजली अर्पण करत देशमुख कुटुंबीयांचे सांत्वन केले. स्व. आर. टी. देशमुख यांचे एका कार अपघातात लातूर जिल्ह्यातून परतत असताना दुर्दैवी निधन झाले होते. मात्र त्यावेळी धनंजय मुंडे हे विपश्यना केंद्रात असल्याने अंत्यविधिस उपस्थित नव्हते. धनंजय मु ंडे यांनी देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली तेव्हा ते चांगलेच भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. आर. टी. देशमुख हे स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब तसेच स्व. पंडित अण्णा मु ंड` यांच्या सोबत अगदी तळागाळात काम केलेले एक सच्चे सहकारी म्हणून सुपरिचित होते. त्यांच्या आठवणींना उजाळा देताना मुंडेसह देशमुख कुटुंबीय सुध्दा भावूक



झाल्याचे पाहायला मिळाले. जीजांचे अकाली निधन ही देशमुख कुटुंबाइतकीच मुंडे कुटुंबाची सुद्धा हानी असून आता तिहाने कधीही भरून निघणार नाही अशा शब्दात धनंजय मुंडे यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली.


# अवकाळी पावसाच्या तडाख्याने ४ एकरवरील शेतकऱ्याचे टरबूज सडले



केज : तालुक्यातील ग्रीनबेल्ट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागातील सोनेसांगवी येथील शेतकऱ्याने पावणे चार एकर जमिनीवर अडीच लाख रुपये खर्च करून टरबूजाचे पीक जोपासले होते. शेतकऱ्याने जीवलावून मशागत केल्यामुळे १ ते ५ किलोपर्यंत टरबूज पोसले होते. ऐन तोडणी करून टरबूज विक्रीच्या वेळीच १५ ते २० दिवस अवकाळी पावसाने झड लावल्यामुळे सर्व टरबूज जागेवर सडल्याने जवळपास १० लाख रुपयांची हानी झाली आहे. सोनेसांगवी येथील राजाभाऊ भाऊसाहेब कणसे यांनी आपल्या पावणे चार एकर जमिनीवर मार्च महिन्यात ५० हजार रुपये खर्च करून टरबूज पिकाची २१ हजार रोपांची लागवड केली. त्यानंतर खतांसाठी ६० हजार रुपये, एक लाख रुपयांची किटकनाशक फवारणी केली. वेलीला १ ते ५ किलो वजनाचे टरबूज पोसले होते. मे महिन्यात पहिली तोडणी करून विक्री करण्याच्या वेळीच अवकाळी पावसाने हजेरी लावली. दररोज ढगाळ वातावरण आणि पावसाची झड १५ ते २० दिवस राहिल्याने टरबूज वेलीपासून आपोआपच तुटून बाजूला होत जागेवरच सडले. त्यामुळे शेतकऱ्याच्या पदरात काहीच उत्पन्न पडले नाही. उलट लागवड, खत, फवारणीचा जवळपास अडीच लाख रुपयांचा खर्च पाण्यात गेला आहे. अवकाळी पावसाने शेतकऱ्याच्या तोंडचा घास हिरावून १० लाख रुपयांची हानी झाली आहे. शासनाने या नुकसानीची दखल घेऊन नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी राजाभाऊ कणसे यांनी तहसीलदार यांचेकडे केली आहे.

# महिला आयोगाला ताकद देण्याची गरज, एकीला टार्गेट करुन प्रश्न सुटणार नाही - चित्रा वाघ

राज्यातील महिलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ होत आहे, त्यामुळे आज महिला आयोगाबाबत एक विशेष बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीत महिलांच्या सुरक्षेबाबत महत्वाची चर्चा झाली. या बैठकीला राज्यातील अनेक महिला नेत्या उपस्थित होत्या. या बैठकीनंतर चित्रा वाघ यांनी बैठकीबाबत माहिती आहे, त्यांनी नेमकं काय म्हटले ते जाणून घेऊयात. काय म्हणाल्या चित्रा वाघ? महिला आयोगाबाबतच्या या विशेष बैठकीनंतर चित्रा वाघ यांनी सांगितले की, ‘आजच्या बैठकीत चांगली चर्चा झाली, सर्वांनी चांगले इनपूट दिले. महिला आयोगाला ताकद देण्याची गरज आहे. महिला आयोगात काही लुप होल आहेत, त्यावर काम करावं लागणार आहे. त्यामुळे आगामी काळात याबाबत आणखी बैठका होणार आहे.’ पुण्यातील वैष्णवी हगवणे



यांच्या आत्महत्तेच्या घटनेनंतर विरोधकांकडून राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. यावर बोलताना चित्रा वाघ यांनी म्हटले की, ‘मी सुद्धा या पदावर काम केलं आहे. एका व्यक्तीला टार्गेट करुन प्रश्न सुटणार नाही. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी त्यांची बाजू समजून तर घ्यायला हवी.’ पुढे बोलताना चित्रा वाघ यांनी सांगितले की, राज्य महिला आयोगाकडे मेलद्वारे अनेक महिला तक्रार करत असतात. मात्र मेल वाचायला आणि त्याला रिप्लाय द्यायला माणसं नाहीत. त्यामुळे एका व्यवस्थेला टार्गेट करुन चालणार नाही. एक केस नाही तर प्रत्येक केसमध्ये महिला आयोगामध्ये अननियमितता झाली असेल तर त्याची चौकशी होईल. महिला आयोग कुठे चुकले ,भरोसा सेल कुठे चुकला याची चौकशी होईल. अध्यक्ष राजकीय नसावा का? महिला आयोगाचा अध्यक्ष राजकीय नसावा अशी मागणी काही विरोधकांनी केली आहे. याबाबत बोलताना चित्रा वाघ म्हणाल्या की, महिला आयोगाचा अध्यक्ष राजकीय नसावा असं जे म्हणत आहे त्यांच्याही कार्यकाळात राजकीय अध्यक्ष होता. रुपाली चाकणकर यांची ही दुसरी टर्म आहे. विरोधकांच्या कार्यकाळातही राजकीय व्यक्तीकडेच महिला आयोगाचे नेतृत्व होते.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर






## आंतरराष्ट्रीय

# भारत-रशिया जवळ येताच अमेरिकेचा थयथयाट, ट्रम्प यांच्या मंत्र्याचं भारतविरोधी वक्तव्य

भारत अमेरिकेला आपला मित्र मानतो. पण आता त्यांचा खरा चेहरा समोर येऊ लागला आहे. भारताबद्दलच अमेरिकेच खरं रुप त्यांचे अधिकारीच समोर आणत आहेत. अमेरिकेचे वाणिज्य मंत्री हॉवर्ड लुटनिक यांनी भारताबद्दल हैराण करणारं वक्तव्य केलं आहे. रशियाकडून भारताची शस्त्रास्त्र खरेदी आणि भारताने ब्रिक्स देशांच सदस्य असणं यावर मंत्री हॉवर्ड लुटनिक यांनी आक्षेप नोंदवला आहे. भारताने नेहमीच अमेरिका आणि रशिया सोबत चांगले संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. कुठल्याही दबावाशिवाय आपलं हित साधलं आहे. आता हीच गोष्ट अमेरिकेला खुपू लागली आहे. रशियाकडून भारताची शस्त्रास्त्र खरेदी अमेरिकेच्या नाराजीच कारण आहे. मागच्या काही दिवसांपासून ट्रम्प प्रशासन सातत्याने भारतविरोधी वक्तव्य करत आहे. वॉशिंग्टन डीसी येथे एका इंटरव्यूमध्ये अमेरिकी वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक म्हणाले की, "भारत सरकारने अशा काही गोष्टी केल्या आहेत, ज्याचा सामान्यपणे अमेरिकेवर वाईट परिणाम होतो" लुटनिक उदहारण देताना म्हणाले की, "तुम्ही रशियाकडून शस्त्रास्त्र खरेदी करत



असाल, तर अमेरिकेला त्रास देण्याची ही एक पद्धत आहे तसचं ब्रिक्स समूहातील देशांना डॉलरच वर्चस्व मान्य नाही" अमेरिकेला काय मान्य नाही?

### ट्रम्प यांचा अतातयीपणा

सध्या डोनाल्ड ट्रम्प अशा भूमिका घेत आहेत, त्यामुळे जगात अनेक देशांसोबत अमेरिकेचे संबंध बिघडत चालले आहेत. भारत-पाकिस्तान शस्त्रसंधीच्यावेळी सुद्धा अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी असाच अतातयीपणा केला. त्यांनी X वर पोस्ट करुन शस्त्रसंधीची घोषणा केली. त्यांना श्रेय घेण्याची घाई झालेली. पण त्यामुळे केंद्र सरकारला अनेक प्रश्नांना सामोर जावं लागलं. भारत सरकारने ट्रम्प यांना हे श्रेय घेऊ दिलं नाही. भारत-पाकिस्तानने ठरवल्यामुळे शस्त्रसंधी झाल्याची भारताची भूमिका आहे. मात्र, तरीही डोनाल्ड ट्रम्प त्यांना वाट्टेल तेच बोलत आहेत.

# महात्मा गांधी यांच्यानंतर नरेंद्र मोदी दुसरे महान नेते, अमेरिकेतील खासदारांकडून भारताचे कौतूक

जागतिक पातळीवर भारताचा दबदबा वाढत आहे. भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. त्याचे परिणाम समोर येऊ लागले आहे. अमेरिकेत यूएस इंडिया स्ट्रेटेजिक पार्टनरशिप फोरममध्ये भारताचे कौतूक करण्यात आले. यावेळी अमेरिकेतील खासदार आणि इंडिया कॉकसचे सह-अध्यक्ष रिच मॅककॉर्मिक यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भरभरुन कौतूक केले. अमेरिकेतील राजकीय तज्ज्ञही आता येणारा काळ भारताचा असल्याचे मान्य करु लागले आहे. यामुळे यूएस इंडिया स्ट्रेटेजिक पार्टनरशिप फोरममध्ये अमेरिकन प्रतिनिधींकडून भारतावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनक यांनी म्हटले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे दोन्ही नेते असे आहेत की त्यांना संपूर्ण देशाचा पाठिंबा मिळाला आहे. नरेंद्र मोदींबाबत काय म्हणाले? रिच मॅककॉर्मिक यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे



कौतूक करताना म्हटले की, नरेंद्र मोदी हे भारतातील सर्वात प्रभावशाली नेते आहेत. कदाचित महात्मा गांधी यांच्यानंतर ते दुसरे सर्वात महान नेते आहेत. ते विनयशील आहेत. जनता त्यांना पंतप्रधान होण्यापूर्वीही ओळखत होती. ते खरे जननेता आहेत. ते आक्रमक राष्ट्रवादाचे प्रतिक आहेत. जागतिक दृष्टीकोन चांगल्या पद्धतीने समजून त्यांनी भारताची अर्थव्यवस्था मजबूत केली आहे. वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनक यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची तुलना करताना म्हटले की, अमेरिकेत संपूर्ण देशातून निवडलेला व्यक्ती सर्वोच्च पदावर आहे. भारतात नरेंद्र मोदी यांचीही परिस्थिती अशीच आहे. दोन्ही नेत्यांमध्ये चांगले संबंध आहे. त्यामुळे दोन्ही देशातील व्यापार वाढत आहे. काही करार होण्यास वेळ लागतो, परंतु प्रयत्न सुरु ठेवले पाहिजे. अमेरिकेतील खासदार स्टीव्ह डेन्स यांनी भारताची तुलना चीनसोबत केली. ते म्हणाले, जागतिक पातळीवर गुंतवणूक आता चीनऐवजी भारताकडे वाढत आहे. भारतातील माझा प्रवास मला २० वर्षांपूर्वीचा चीनची आठवण करु देतो. भारतात खूप शक्यता आहेत आणि नवीन गोष्टी उदयास येत आहेत.

# भारताचा सर्वात मोठा शत्रू ठार



पाकिस्तानमधील कुख्यात दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदचा दहशतवादी अब्दुल अजीज एसारचा मृत्यू झाला आहे. अब्दुल अजीजचा मृतदेह पंजाबमधील बहावलपूर परिसरात आढळून आला आहे. त्याच्या मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र परिसरात खळबळ उडाली आहे. मंगळवारी जैश-ए-मोहम्मदच्या बहावलपूर येथील मुख्यालयात त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. यावेळी जैशचे अनेक मोठे नेते उपस्थित राहण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी पहाटे अब्दुल अजीजच्या सहकाऱ्यांना त्याचा मृतदेह गूढ परिस्थितीत सापडला. सुरुवातीला अब्दुल अजीजचा गोळी लागल्याने मृत्यू झाल्याचे बोलले जात होते, मात्र जैश-ए-मोहम्मदच्या एन्क्रिप्टेड सोशल मीडिया अकाऊंटवरून करण्यात आलेल्या एका पोस्टमध्ये ही शक्यता फेटाळण्यात आली आहे. या पोस्टमध्ये मृत्यूचे कारण स्पष्ट नाही. यामुळे त्याच्या मृत्यूबाबतचे गूढ आणखी वाढले आहे. सुरक्षा विश्लेषकांमध्ये आणि गुप्तचर यंत्रणांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे.

# युक्रेन चवताळला, रशियावर क्षेपणास्त्रांचा पाऊस



सध्या रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध चांगलंच पेटलं आहे. युक्रेनने रशियावर आतापर्यंतचा सर्वांत मोठा हल्ला केला आहे. या ड्रोन हल्ल्यानंतर रशियानेही प्रत्युत्तरादाखल ड्रोन हल्ले तसेच क्षेपणास्त्र डागले आहेत. यात युक्रेनमधील अनेक नागरिक मृत्युमुखी पडले आहेत. याच कारणामुळे आता दोन्ही देशांतील युद्धाचा नवा अध्याय चालू झाला आहे. दरम्यान, आता नव्या हल्ल्यात युक्रेनने रशियाचे तब्बल 1000 सैनिक मारले असल्याचा दावा केला जातोय.युक्रेनच्या जनरल्स स्टाफनुसार युक्रेनच्या लष्कराने गेल्या 24 तासांत रशियाचे तब्बल 1100 सैनिक मारले आहेत. यामध्ये बहुसंख्य सैनिक हे कुर्स्क आणि सुमी या भागात तैनात केलेले होते. युक्रेनच्या जनरल स्टाफचा हा दावा ग्राह्य धरला तर युक्रेनने आतापर्यंत रशियाचे तब्बल 990,800 सैनिक मारले आहेत.

# भारताने मारलं जास्त, सांगितलं कमी

## पाकिस्तानची डोजियरमधून पहिल्यांदा मोठी कबुली


ऑपरेशन सिंदूर संदर्भात पाकिस्तानचा मोठा कबूलनामा समोर आलाय. भारतीय सैन्याने जो दावा केला होता, त्यापेक्षा या ऑपरेशनमध्ये पाकिस्तानच जास्त नुकसान झालय. पाकिस्तानच्या डोजियरमधून ही कबुली समोर आलीय. रिपोर्टमध्ये स्पष्टपणे म्हटलय भारताने जास्त मारलं पण सांगितलं कमी. हल्ल्यानंतर भारतीय सैन्याने सांगितलं होतं की, पाकिस्तानात 9 दहशतवादी ठिकाणांवर हल्ला करण्यात आलाय. पण डोजियरमध्ये मॅपच्या माध्यमातून सांगण्यात आलय की, भारताने




पाकिस्तानात फक्त 9 नाही, जास्त ठिकाणी हल्ला केला. मॅपमध्ये पेशावर, झांग, सिंधच्या हैदराबाद, पंजाबमध्ये गुजरांवाला, भवालनगर, अटक आणि छोर येथे हल्ला केल्याच दाखवण्यात आलय. मागच्या महिन्यात प्रेस ब्रीफिंगमध्ये सैन्यदलांनी या ठिकाणांची नाव घेतली नव्हती. पाकिस्तानने ऑपरेशन बुनयान उन मार्सोस वर डोजियर बनवलं आहे. भारताने जी ठिकाणं सांगितली, त्यापेक्षा 8 जास्त ठिकाणांची नाव पाकिस्तानने घेतली आहेत. यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते, भारताने पाकिस्तानात किती खोलवर हल्ले केलेत. 18 मे रोजी पाकिस्तानने अनेक देशांना डोजियर सोपवलं. त्यातून भारताने सांगितल्यापेक्षा मोठा हल्ला केल्याच समोर आलय. पाकिस्तानने स्वत:च आता ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय मिसाइल आणि ड्रोन हल्ल्यात मोठं नुकसान झाल्याच कबूल केलय. पाकिस्तानी डोजियरनुसार, भारताने आणखी किती ठिकाणी हल्ला केला? पेशावर झांग सिंधमध्ये हैदराबाद पंजाबमध्ये गुजरांवाला भवालनगर अटक छोर भारतीय सैन्यदलांनी 7 मे रोजीच्या प्रेस ब्रिफिंगमध्ये किती ठिकाणी हल्ला केल्याची माहिती दिलेली ? बहावलपूरध्ये जैश-ए-मोहम्मदच मुख्यालय मुरीदकेमध्ये लश्कर-ए-तैयबा दहशतवादी केंद्र मुजफ्फराबाद कोटली रावलकोट चकस्वारी भीमबेर नीलम घाटी झेलम चकवाल भारताने माहिती देणं का टाळलं असावं? भारताने ज्या ठिकाणी अतिरिक्त हल्ले केले, त्या बद्दल माहिती देणं प्रेस ब्रीफिंगमध्ये टाळलं, कदाचित हा रणनितीक निर्णय असावा. पाकिस्ताननेच त्यांच्या तोंडाने किती मोठ नुकसान झालय त्याची कबुली द्यावी हा त्यामागे उद्देश असू शकतो. 7 मे च्या पत्रकार परिषदेत भारताने फक्त आम्ही दहशतवादी ठिकाणांना लक्ष्य केलं, एवढच सांगितलं. पाकिस्तानने प्रत्युत्तर म्हणून भारताच्या पश्चिमी भागात नागरिक क्षेत्र आणि सैन्य ठिकाणांना

# चीनने ब्रह्मपुत्रच पाणी रोखलं तर काय? पाकिस्तानच्या धमकीत अजिबात दम नाही

भारताने सिंधू जल करार स्थगित करुन पाकिस्तानची चांगलीच कोंडी केली आहे. त्यामुळे त्यांचा थयथयाट सुरु आहे. त्यांच्याकडून वेगवेगळ्या धमक्या दिल्या जात आहेत. भारताला घाबरवण्यासाठी पाकिस्तानने एक नवीन टूम सोडली आहे. भारताने जसा सिंधू जल करार स्थगित केला, तसं चीन संभवत: ब्रह्मपुत्र नदीच पाणी रोखू शकतो, असा पाकिस्तानचा दावा आहे. आसामचे मुख्यमंत्री हिंमत बिस्वा सरमा या धमकीवर तथ्यांसह उत्तर दिलं आहे. त्याने पाकिस्तानचे डोळे उघडतील. भारतात वाहणाऱ्या ब्रह्मपुत्र नदीचा प्रवाह चीनवर



अवलंबून आहे ही पाकिस्तानची थ्योरी हिंमत बिस्वा सरमा यांनी फेटाळून लावली. त्यांनी X वर पोस्ट करुन विस्ताराने या बाबत माहिती दिली आहे. ब्रह्मपुत्र नदी भारतात आत्मनिर्भर आहे. भारतात ब्रह्मपुत्रेला आपला प्रवाह वाहता ठेवण्यासाठी चीनवर अवलंबून राहण्याची अजिबात गरज नाही. ब्रह्मपुत्रेच्या एकूण जल प्रवाहात चीनच फक्त 30 ते 35 टक्के योगदान आहे. ग्लेशियरच वितळणं आणि मर्यादीत पाऊस याचा समावेश आहे असं हिंमत बिस्वा सरमा यांनी सांगितलं. पाकिस्तानच्या दाव्यात का दम नाही ते समजून घ्या भारताने जेव्हापासून सिंधू जल करार स्थगित केलाय, तेव्हापासून पाकिस्तानच्या धमक्या सुरु आहेत. आता चीनच्या नावाने भारताला घाबरवण्याचा प्रयत्न सुरु आहे. "चीनने ब्रह्मपुत्रच पाणी रोखलं तर?. ही खोटी कल्पना भितीने नाही, तर तथ्य आणि राष्ट्रीय स्पष्टतेच्या आधारावर मोडूया. ब्रह्मपुत्र नदी भारतात कमी होत नाही, उलट वाढते. चीन ब्रह्मपुत्रच्या एकूण प्रवाहात केवळ 30 ते 35 टक्के योगदान देतो. त्यात हिमनद्या वितळून येणारं पाणी आणि मर्यादीत पाऊस याचा समावेश आहे. उर्वरित 65 ते 70 टक्के पाणी भारतातच तयार होतं" त्यामागच कारणही त्यांनी X वर सांगितलं. भारतात ब्रह्मपुत्रेच पाणी कसं तयार होतं? "अरुणाचल प्रदेश, असम, नागालँड आणि मेघालयमध्ये मान्सूनचा मुसळधार पाऊस होतो. सुबनसिरी, लोहित, कामेंग, मानस, धनसिरी, जिया-भाराली, कोपिली, मेघालयची खासी, गारो आणि जयंतिया, डोंगररागांमधून येणाऱ्या कृष्णाई, दिगारू, कुलसी आदि सहायक नद्या भारतातील ब्रह्मपुत्र नदीचा प्रमुख जल स्रोत आहेत.

### चीनने उलट ब्रह्मपुत्रेचा जलस्त्रोत कमी केला, तर ते भारताच्या फायद्याच

ते म्हणाले की, 'ब्रह्मपुत्र नदी भारतात प्रवेश केल्यानंतर सशक्त होते. ही एक भारतीय वर्षा-पोषित नदी प्रणाली आहे. ब्रह्मपुत्रेच पाणी कुठल्या ठराविक एका स्त्रोतांवर अवलंबून नाही. पाकिस्तानने हे सत्य जाणून घेणं आवश्यक आहे की, जर चीनने कधी ब्रह्मपुत्रेचा जलस्तर कमी केला, तर ते भारताच्या फायद्याचच असेल. कारण दरवर्षी पावसाळ्यात आसाममध्ये येणाऱ्या भीषण पुरात लाखो लोक विस्थापित होतात. मोठ्या प्रमाणात नुकसान होतं.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com